Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-IX SEPTEMBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# लोकनेता सुधीर मुनगंटीवार

**दैवत रघुनाथ बोरकर**
पिएच. डी. संशोधक
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सारांश :**

*सुधिर मुनगंटीवार आज महाराष्ट्र राज्याचे वन व वित्त मंत्री आहेत. १९९५ पासून आजपर्यंत सुधीर मुनगंटीवार आमदार म्हणून विधानसभेत जनतेचे प्रतिनिधीत्व करित आहेत. दिर्घकाळ लोकप्रतिनीधीत्व केल्यानंतरही सर्व सामान्य कार्यकर्ता किंवा आम जनता आजही प्रत्यक्षपणे सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यामुळे त्यांच्याशी जुळून आहे. हीच त्यांची शैली व ताकद आहे. त्यामुळे सुधीर मुनगंटीवार खऱ्या अर्थाने लोकनेता आहेत.*

**प्रस्तावना :**

**'य:नीयती इति नेता'** अशी नेत्याची व्याख्या करण्यात येते. जो अनुयायी, समाज, देश आणि जगाला पुढे घेऊन जातो त्यांची उन्नती घडवून आणतो. तो नेता आपल्या समाजाचे, जनतेचे आणि विशषत: त्यामधील दुर्बल, मागास आणि पिडीतांचे दु:ख जाणून घेऊन त्यांचे दु:ख दुर करण्यास सतत तयार असलेला, पुढे जाऊ पहाणाऱ्यांना उत्तेजन देणारा, मागे पडणाऱ्यांना प्रेरणा देणारा आणि सर्वसामान्यांना बरोबर नेणारा असा असेल तोच नेता म्हणुन स्वीकारला जातो. हे सर्व गुण सुधीर मुनगंटीवार यांच्या अंगी असल्याने जनसामान्यांनी त्यांना आपले मानले.

**जनसामान्यांचा आवाज सुधीर मुनगंटीवार**

सुधीर मुनगंटीवार हे सतत लोकांच्या गर्दीत मिसळणारा खरा लोकनेता आहे. समाजाजील विविध भागातील वेगवेगळे प्रश्न जेव्हा सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे येतात त्या प्रश्नांना सोडवणे हे एक आव्हानच असते. परंतु दुर्दम्य इच्छाशक्तीचा हा नेता सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठीच जन्म झाला आहे, हे ठरवून तो सर्वसामान्यांचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे व तो प्रश्न निकाली लावतात. एक प्रश्न सुटत नाही तर अनेक प्रश्न समोर असतातच या अनेक प्रश्नांचे उत्तर सुधीर मुनगंटीवार गेल्या तीन दशका पासून अत्यंत प्रामानिकपणे सोडवत आहेत. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार यांचा जन्म ३० जुलै १९६२ ला झाला. त्यांच्या आईचे नांव चांगुनाबाई असे आहे. त्यांचे शिक्षण एम. कॉम, एल.एल.बी., एम. फिल., डी.बी.एम., डी.आय.आय.पी.एम, बी. जे. असे आहे. १९७९ ला सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे छात्रसंघाच्या सहसचिव म्हणुन त्यांची निवड झाली. १९८० मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या चंद्रपूर शहर सचिव पदी नियुक्ती झाली. १९८७ ला भारतीय जनता युवामोर्चा, चंदपूर शहर अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली. १९८९ व १९९१ चंद्रपूर येथे लोकसभा मतदार संघात उभे राहिले परंतु त्यांचा निवडणूकीत पराभव झाला. १९९५ ला श्याम वानखेडे यांचा पराभव करून ५५००० मताधिक्याने विदर्भात सर्वाधिक मतानी विजय ठरले. १९९६ ला भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारीणी चे सरचिटणीस म्हणुन नियुक्ती झाली. २ फेब्रुवारी १९९९ साली मुख्यमंत्री नारायण राणे यांच्या मंत्रीमंडळात पर्यटन ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री म्हणुन नियुक्ती झाली. १९९८ साली राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने देण्यात येणारा विधानसभेतील 'उत्कृष्ट वक्ता' पुरस्काराचे ते मानकरी ठरले.

५ ऑक्टोंबर १९९९ साली चंद्रपूर साली चंद्रपूर विधानसभा निवडणुकीत पुनश्च विजयी झाले. २००१ साली भाजपायुमोचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणुन त्यांची नियुक्ती झाली. १६ ऑक्टोंबर २००४ च्या चंद्रपूर विधानसभा निवडणूकीत विजयाची हॅट्रीक मारली. ५ जुन २००८ ला अंध कल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्याबद्दल राष्ट्रीय दृष्टिहीन संघाच्या वतील जी.एल. नर्डेकर स्मृती पुरस्कार प्राप्त झाले. सन २००९ मध्ये बल्लारपूर विधानसभा मतदार संघातून सुधीर मुनगंटीवार

विजयी झाले. सन २०१० मध्ये महाराष्ट्र भाजपा अध्यक्ष झाले. सन २०१४ मध्ये बल्लारपूर मतदार संघातून पुन्हा विजयी झाले. महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन होत २०१४ मध्ये सुधीर मुनगंटीवार महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री झाले.

सुधीर मुनगंटीवार यांच्या व्यक्तिमत्वात एक चुंबकीय आकर्षण आहे. जवळचे सहकारी तर आहेतच परंतु विरोधी पक्षातील नेतेही सुधीर मुनगंटीवाराच्या कामाचा व्याप, लोकसंग्रह बघुण अवाक होतात. सुधीर मुनगंटीवार आमदार म्हणून बल्लारपुरचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. अनेक वर्ष जवळ सत्ता नसतांनाही विरोधी पक्षाच्या बाकावर बसुन जनतेचे प्रश्न सोडविणे हे खरच आव्हानच होते. विधानसभेत सर्वात जास्त प्रश्न विचारणारे जे आमदार आहेत त्यात सुधीर मुनगंटीवार अग्रस्थानी होते. भाऊंकडे आलेल्या प्रत्येक समस्येचा पाठपुरावा अतिशय व्यवस्थीत होतो. तलाठ्यापासुन मुख्य सचिवापर्यंत प्रत्येकाकडे लेखी स्वरूपात त्या प्रश्नाच्या गरजेनुसार पाठपुरावा होणार, जोपर्यंत तो प्रश्न सुटत नाही तोपर्यंत. सुधीर मुनगंटीवार सर्वांच्या हाकेस रात्री, अपरात्री हो देण्यास तत्पर असलेला लोकनेता, मग विरोधी असो किंवा मित्र, कोणत्या धर्माचा जातिचा आहे हे न पाहता रडता येणाराही या व्यक्तिच्या दारातुन हसत जातो. कोणत्याही कामास नकार न देता तन–मन–धना ने मदतीचा हात दणारे सुधीर मुनगंटीवार हे एक लोकनेता आहेत. नेत्याकडे केवळ द्रष्टेपणाचा असुन उपयोग नसतो. कृतीशीलता असणे, हाही महान नेत्याचा एक आवश्यक गुण असावा लागतो. तो सुधीर मुनगंटीवारांकडे पहावयास मिळतो.

**'पुर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावीकाळ,**
**बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ'**

एक पाऊल समाजाच्या बरोबर आणि दुसरे समाजाच्या पुढे प्रगतीचा वेध घेणारे सुधीर मुनगंटीवार, सुक्ष्म छिद्रातून जसा सुर्यप्रकाश जाणवतो तसाच किरकोळ गोष्टीतून मानसाचा स्वभाव कळतो. ज्याप्रमाणे मोठ्या मानसाच्या छोट्या गोष्टीतुन सुध्दा त्याचे अंतरंग स्पष्टपणे जाणवते ते लपुन राहत नाही हीच गोष्ट सुधीर मुनगंटीवार यांच्या स्वभावातून स्पष्ट होते.

**'झाले बहुत, होतील बहुत, परी यासमं हाच'** अशी म्हण महाराष्ट्रात रूढ आहे. अमोध वकृत्व, दांडगा जनसंकल्प, कुशल नेतृत्व अशा विविध गुणवैशिष्ट्यांच्या बळावर एक कर्तव्यदक्ष लोक प्रतिनीधीची प्रतिमा निर्माण करणारे सुधीर मुनगंटीवार यांना ही म्हण लागु होते. सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नासाठी विधानसभेत आक्रमकपणे शासनाशी संघर्ष करून प्रश्नाची सोडवणूक करणारे लोक प्रतिनिधी म्हणून आपली एक वेगळी प्रतिमा सुधीर मुनगंटीवार यांनी निर्माण केली.

१९९५ च्या विधानसभा निवडणूकीपूर्वी जनतेला जाहीरपणे सांगीतले की बल्लारपूर तालुका जर मी निर्माण करू शकलो नाही तर भविष्यात पुन्हा निवडणूक लढविणार नाही. आपली राजकीय शक्ती पणाला लावुन ही प्रतिज्ञा त्यांनी पुर्ण केली. २०१४ च्या निवडणूकी पुर्वी त्यांनी हजारो महिला यांच्यापुढे जाहीरपणे सांगीतले की मी जर सत्तेत आलो तर चंद्रपूर जिल्हात दारूबंदी करीन आणि त्यांनी ही प्रतिज्ञा पुर्ण केली.

**निष्कर्श :**

सुधीर मुनगंटीवार सर्वसामान्य जनतेचा दुर्बल, मागास आणि पीडीतांचे दु:ख जाणून घेऊन त्यांचे प्रश्न सोडवण्यास सतत तयार असलेला लोक नेता आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

१) दै. सकाळ, उत्तुंग, मा. ना. सुधीर मुनगटीवार वाढदिवस विशेषांक, कार्य. संपा. शैलेश पांडे, २०१७
२) सुधीर मुनगंटीवार, गाथा संघर्षाची, हरिवंश ऑफसेट प्रिन्टर्स, जानेवारी २००७
३) सच्चिदानंद मुनगंटीवार, मुलाखत , श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे वडील.
४) दै. लोकसत्ता 'ध्यासपर्व' नागपूर बुधवार ९ सप्टेंबर २००९